

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458234

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

// करारनामा //

पे अॅण्ड पार्क अधिकार देणेकरिताचा करारनामा

हा करारनामा मुक्काम 'भाईंदर, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य येथे आज दिनांक ३०--माहे मार्च सन २०२६ रोजी करण्यात आला.

प्रथम पक्षिय
(हयापुढे सोईचे दृष्टीने
"महानगरपालिका" असा उल्लेख केला आहे.)

मिरा-भाईंदर महानगरपालिका
भाईंदर (पश्चिम)

आणि

द्वितीय पक्षिय
(हयापुढे सोईचे दृष्टीने
एजंट / ठेकेदार" असा उल्लेख केला आहे

मे. शुभम कॉपोरेशन
शॉप नं.१२, किंजल ला विस्टा
पुनम सागर कॉम्पलेक्स,
मिरा रोड (पुर्व) ४०११०७

For M/S. SHUBHAM CORPORATION
Proprietor

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458232

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

यांच्यामध्ये होत आहे. 16/12/25

ज्याअर्थी, मिरा-भाईंदर महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार स्थापन झाली आहे आणि त्यांचे मुख्य कार्यालय स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ४०११०१ येथे आहे.

आणि, ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २४३(अ) अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुक पोलीस व आर.टी.ओ. इत्यादींशी विचारविनिमय करून मिरा भाईंदर शहरासाठी सार्वजनिक जागेवर "पैसे भरा आणि वाहने उभी करा" (पे ॲन्ड पार्क) या तत्वावर वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा/ ठिकाणे प्रस्तावित केली आहे आणि त्यासाठी वाहन चालक/मालकांकडून वाहने, नमुद वेळेत, नमुद ठिकाणी वाहने उभी करण्यासाठी आकारावयाचे शुल्क (पार्कींग चार्जेस) वसुल करण्यासाठी मा महासभा दि.०८/१२/२०१७ ठराव क्र. ३४ अन्वये दर मंजुर करण्यात आले आहेत.

ज्याअर्थी, महानगरपालिकेने (अ) मिरा भाईंदर महानगरपालिका भाईंदर (पश्चिम) रेल्वे स्टेशन जवळ स्काय वॉक खाली वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणेबाबत, या जागी परिशिष्ट 'डी' मधील नमुद पार्कींग क्षमतेसाठी खाजगी संस्थेमार्फत तीन वर्षाच्या कालावधीसाठी पे ॲण्ड पार्क योजना राबविणेकरीता आणि वाहन चालक/मालकांकडून पार्कींग चार्जेस वसूल करणे या कामाकरिता दि.०९/०५/२०२५ रोजीच्या दै.सुरजप्रकाश,व दै. प्रतिष्ठा ठाणे टाईम्स " या वृत्तपत्रातून प्रसिध्दी देऊन निविदा मागविलेल्या होत्या.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458233

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

Treasury Office Vasai

आणि, ज्याअर्थी ठेकेदार हयांनी “"पैसे भरा आणि वाहने उभी करा"” (पे अॅन्ड पार्क) योजना नूसार, निविदा फॉर्म व पुस्तिकेमध्ये विस्तृतपणे वर्णन केलेल्या जागेत वाहनतळ चालविणेसाठी महापालिकेस दि.०३/२/२०२५ रोजी प्रस्ताव सादर केला आहे.

आणि, ज्याअर्थी स्वीकृत पत्रात नमूद केल्यानुसार सुरक्षा अनामत रक्कम रुपये ३,७१,३६७/- बँक गॅरंटी स्वरुपात भरणा केला आहे.

एजंट/ठेकेदार यांनी निविदा फॉर्म व पुस्तिकेमध्ये विस्तृत वर्णन केलेल्या वाहनतळाच्या जागेत “"पैसे भरा आणि वाहने उभी करा” या तत्वावर ठेका चालविणेत असलेली योग्यता व क्षमता,सादर केलेले दर, काम करणेसाठी असलेला रस व तीव्र इच्छा पाहून महानगरपालिकेने ठेकेदार यांचा प्रस्ताव स्विकारला आहे. आणि ठेकेदार यांना स्वीकृत पत्र देण्यात आले आहे.

आणि, ज्याअर्थी प्रस्ताव दस्तऐवजांमध्ये नमुद केलेल्या अटी, शर्ती, निर्देश आणि सुचनांचे योग्य रितीने पालन करण्याची सर्व जबाबदारी एजंट/ठेकेदार हयांची आहे.

त्याअर्थी, सदरचा करारनामा साक्षीदारांच्या समक्ष करण्यात येत असून उभयपक्षांमध्ये मान्य व कबुल करण्यात येत आहे. ते खालीलप्रमाणे –

अटी व शर्ती


अ) कराराची व्याप्ती: -

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458230

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

16/12/25

१) हा करारनामा खालील नमुद केल्याप्रमाणे ठराविक / विनिर्दिष्ट ठिकाणी दर्शविलेल्या वाहनतळाच्या जागेत (पे ॲन्ड पार्क) योजना चालविण्यासाठीचे अधिकार प्रदान करण्यासाठी आहे.

ठिकाण	वाहन क्षमता (एका वेळची)
भाईंदर (पश्चिम) रेल्वे स्टेशन जवळ स्कायवॉक खाली	१०६ दुचाकी
एकूण	१०६ दुचाकी

2) वरील नमुद वाहनतळावरील वाहनांकरीता चालकांकडून महानगरपालिकेने वेळोवेळी काढलेल्या सुचना पत्रानुसार लागू केलेल्या दरांप्रमाणे "पैसे भरा आणि वाहने उभी करा" शुल्क वसुल करण्यास एजंट /ठेकेदार यांना कायदेशिर अधिकार देण्यात येत आहेत

3) ठेकेदार यांनी वरील प्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या जागेव्यतिरिक्त कोणतीही अतिरिक्त जागा किंवा ठिकाणांचा पार्किंगसाठी वापर करू नये, तसे केल्यास, सदर ठेकेदार यांनी या निविदेच्या नियमांचे उल्लघंन केले आहे असे मानून प्रथम पक्षीय यांनी निर्देशित केलेली कारवाई ठेकेदार यांस बंधनकारक राहील.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458231

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

4) एजंट/ठेकेदार मान्य व कबूल करतात की, महापालिकेच्या मंजुरी शिवाय याठिकाणी दिलेल्या करारातील फायदे आणि विशेष हक्क किंवा त्यातील काही भाग व त्यातील कोणतेही हित संबंध इतर कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना एजंट/ठेकेदार हस्तांतरण किंवा पोट भाडयाने देणार नाहीत.

बी) कराराचा कालावधी आणि सुरुवात :-

1) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील निविदा पुस्तिकेमध्ये दर्शविलेल्या जागेवर पे ॲण्ड पार्क चालविणेकरीताचा कालावधी एकूण ३ वर्षाचा राहिल. सदर ३वर्षांचा कालावधी करारनामा केल्याच्या दिनांकापासून गणला जाईल. (कार्यादेशात नमुद केल्याप्रमाणे) ठेकेदार यांनी ३ वर्षांमध्ये भरणा करावयाची महसूल रक्कम वेळोवेळी भरल्यास व अटीशर्तींचा कोणताही भंग न केल्यास व त्यांचे काम महानगरपालिकेस समाधानकारक वाटल्यास किंवा काही कारणास्तव आवश्यकता वाटल्यास प्रथम पक्षिय यांस सदर करारनाम्याच्या कालावधीची मुदत वाढविण्याचा अधिकार राहिल. परंतु सदर मुदतवाढीचा कालावधी ३ वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

सी) पे ॲण्ड पार्कसाठी मंजूर केलेली दरसुची :-

१. एजंट ठेकेदार मान्य करतो की, निविदा पुस्तिकेत दर्शविलेल्या पे ॲन्ड पार्क दरसुची प्रमाणे पैसे वसूल करील.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458228

Sub Treasury Office Vasai

16 DEC 2025

Addl. Treasury Officer

16/12/25

अ. क्र	वाहने	तास व रूपये	तास व रूपये	तास व रूपये	रूपये
१	खाजगी वाहने	६ तासाकरीता	१२ तासाकरीता	२४ तासाकरीता	महिन्याचा पास
i	सायकल	रु.३	रु.५	रु.१०	रु.१५०
ii	दुचाकी वाहन	रु.१५	रु.२०	रु.२५	रु.३५०
२	व्यवसायीक वाहने				
i	दुचाकी/तीन चाकी/चार चाकी (टॅक्सी, टेंपो इ. हलकी वाहने)	रु.६०	रु.१००	रु.१५०	रु.२०००

उक्त रकमेवर १८ टक्के जीएसटी घेणे अनिवार्य राहिल.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458229

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

२. एजंट / ठेकेदार मान्य करतात की, वाहनतळाची जागा 24 तास वाहने उभी करण्याकरीता खुली ठेवण्यात येईल व महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दराप्रमाणेच पार्किंग फी वसूल करेल. तसेच कोणाकडूनही वाढीव रक्कम एजंट / ठेकेदार घेणार नाही. तशी तक्रार प्राप्त झाल्यास महानगरपालिकेकडून करण्यात येणारी कारवाई एजंट /ठेकेदार यांना मान्य असेल.


३. एजंट/ठेकेदार मान्य करतो की, कोणत्याही व्यक्तीस प्राधान्य न देता कटाक्षाने प्रथम येणा-यास प्रथम सेवा तत्वावर गाडी उभी करण्यास परवानगी देईल. कोणत्याही कंपनीच्या, कोणाही विशिष्ट व्यक्ती/व्यक्तींना मासिक परवाना पध्दती व्यतिरिक्त गाडया ठेवण्यास (उभ्या करण्यास) वाहनतळाची कोणतीही विशिष्ट जागा/ठिकाणाचे आरक्षण देणार नाही असे एजंट / ठेकेदार मान्य करतात. तसेच मनपाची वाहने किंवा सरकारी वाहने पे अॅन्ड पार्क मध्ये उभी केल्यास त्याबाबतचे कोणतेही शुल्क ठेकेदार घेणार नाही.

तसेच दरसुची पेक्षा जास्त पैसे ठेकेदार यांनी वसुल केल्याचे निदर्शनास आल्यास अनुसुची '1' मध्ये निश्चित केल्याप्रमाणे दंड आकारण्यात येईल. तसेच करारनामा रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458236

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

16/12/25

ड) पे अॅन्ड पार्क योजना चालविण्यासाठी लागणारी साधने :

1) सदर वाहनतळाच्या जागेमध्ये महानगरपालिकेने मंजुर केलेले दराप्रमाणे वाहने उभे करण्याचे शुल्क दर्शविणारे फलक प्रदर्शित करणे व त्याची देखभाल करणे एजंट/ ठेकेदार हयांना बंधनकारक राहिल.

"ही मिरा भाईंदर महानगरपालिकेची वाहनतळाची जागा आहे" असे दर्शविणारी इंग्रजी व मराठी मध्ये आवश्यक असणारे फलक वाहनतळाचे जागेच्या दर्शनीय भागात प्रदर्शित करणे व याची देखभाल करणे हे एजंट / ठेकेदार हयांना बंधनकारक राहिल.

"उभी करण्यात आलेले वाहने ही वाहन मालकाच्या स्वतःच्या जोखमीवर उभी करण्यात आलेली असून कोणत्याही कारणाने वाहनतळावरील जागेत उभी केलेल्या वाहनांस कोणत्याही कारणाने कोणतेही नुकसान, हानी किंवा चोरी झाल्यास त्यास महानगरपालिका किंवा एजंट / ठेकेदार जबाबदार राहणार नाही. असे दर्शविणारे फलक प्रदर्शित करणे व लावणे व त्याची देखभाल करणे एजंट/ ठेकेदार हयांना बंधनकारक राहिल.

वरीलप्रमाणे फलक न लावल्याचे किंवा त्याची देखभाल न झाल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यास ठेकेदारास रु.2000/- दंड (प्रती दिन) आकारण्यात येईल.


2) एजंट/ठेकेदार मान्य करतात की, कार्यादेशामध्ये नमूद दिनांक व वेळेत पे अॅन्ड पार्क योजना चालविण्यासाठी लागणारी सर्व साधने वाहनतळाच्या जागेत बसवून वाहनतळाची जागा ताब्यात घेतील

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

M1 90



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458227

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

16/12/25

व पे अॅण्ड पार्क नागरिकांकरीता बाहन उभे करण्यास खुले करतील आणि तसे न केल्यास कोणतीही सुचना न देता E.M.D. तसेच सुरक्षा ठेव (Security Deposit) जप्त करण्याचे हक्क महानगरपालिकेला राहतील.

3) अशा प्रकारचे वाहनतळाचे विकसित करण्याचे काम करीत असताना महापालिकेच्या मालमत्तेस काही नुकसान झाल्यास, एजंट/ठेकेदार हे महापालिकेच्या समाधानार्थ त्याची पुर्न: स्थापना करतील. सदर पुन:स्थापना किंवा दुरुस्ती करीताचे होणारे सर्व खर्च सदर एजंट/ ठेकेदार हेच करतील. महापालिका ही सदर दुरुस्ती/पुन:स्थापने करीता कोणतीही रक्कम सदर एजंट/ ठेकेदार यांना देणार नाही.

4) वाहनतळाच्या जागेवरील फर्निचर म्हणजेच पार्कींग-नो पार्कींग चे फलक, वाहनतळाच्या जवळील रस्त्यावरील मार्गदर्शक खुणा, चौकी (Stall) आणि पे अॅन्ड पार्क योजना योग्यरितीने कार्यान्वित (सुरु) व्हावी म्हणून दक्षता घेण्यासाठी व इतर आवश्यक सर्व गोष्टी करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील

इ) देखभाल व दुरुस्ती :

1) पे अॅन्ड पार्क योजना सुरू होण्यापुर्वी वाहने उभी करण्याची पावती पुस्तिका ठेकेदार यांनी स्वत: छापून घ्यावयाची आहे. परंतु सदरची पुस्तिकेचा मसुदा महापालिकेकडून अंतीम करुन घेणे ठेकेदार यांच्यावर

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

96



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458238

Sub Treasury Office Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

बंधनकारक राहिल. सदरची वाहने उभी करण्याचे पावतीमध्ये अनुक्रमाकांसोबत स्थळप्रत, पे अॅन्ड पार्क योजनेचे ठिकाण दर्शविणे, महापालिका व प्राधिकृत एजंट/ठेकेदाराचे नाव, वाहन क्रमांक, आत येण्याची व बाहेर जाण्याची वेळ, वाहने उभे करण्याचे मंजुर दराची यादी, जी.एस.टी.क्रमांक व जीएसटी ची रक्कम आणि "वाहने वाहन मालकीचे जोखमीवर उभी करणे" असे दर्शविणारी सुचना इत्यादींचा सदर पावती पुस्तिकेमध्ये सामावेश असेल. सदर पावती पुस्तिका छापण्यासाठी येणारा खर्च ठेकेदार यांनी करावयाचा आहे. तसेच एजंट/ठेकेदार यांना २५ टक्के पासेस देण्याची अनुमती राहिल.

ठेकेदार यांना मासिक पासेस ठेक्याची मुदत संपण्यापूर्वीच्या ३० दिवस अगोदर संपुष्टात येईल याची खबरदारी घ्यावी. त्यानंतर किंवा ठेक्याची मुदत संपल्यानंतरही मासिक पासेसची मुदत आढळून आल्यास, सदर मासिक पासेस रक्कमेच्या मर्यादित सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

2) वाहनतळाची जागा वाहने उभी किंवा पार्किंगसाठीच वापरण्यात यावी. त्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टीसाठी जागेचा वापर करणार नाहीत असे एजंट/ ठेकेदार मान्य करतात. तसेच सदरची जागा स्वच्छ, व्यवस्थित व चांगल्या स्थितीत ठेवण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

3) वाहनतळाची देखभाल करणे आणि "पैसे भरा वाहन उभे करा" योजना (पे अॅन्ड पार्क) चालविणे याकरीता लागणारा कर्मचारी वर्गाची नेमणूक व कर्मचाऱ्याचा खर्च ठेकेदार यांनी करावयाचा आहे. जबाबदार व्यक्तीचे/व्यवस्थापकांचे नाव मनपास कळविण्याची जबाबदारी एजंट/ ठेकेदार यांची राहील.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

पाँच सौ रुपये Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458235

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

4) ~~तसेच आवश्यक वाटल्यास~~, आणि "पैसे भरा वाहन उभे करा" योजनेसाठी आवश्यक त्या इतर सुविधा यासाठी लागणारा सर्व खर्च एजंट / ठेकेदार यांना करणे बंधनकारक राहिल.

5) एजंट/ठेकेदार त्यांचे देखरेखीखाली गाडी उभी करण्याचे कामावर लक्ष देता यावे म्हणून नीटनेटका गणवेषधारी कर्मचारी वर्गाची नेमणुक करतील असे मान्य करतात.

6) वाहनतळावर ठेकेदार यांनी नेमणुक केलेल्या कर्मचारी यांनी वाहनतळात असलेल्या वाहनांस कोणतेही नुकसान किंवा हानी केल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही, त्यास ठेकेदार जबाबदार राहील.

7) मानवी आरोग्यास व जिवितास धोकादायक असणा-या आजारांची, संसर्गजन्य आजाराची किंवा लागण झालेल्या कोणत्याही व्यक्तीस कर्मचारी म्हणून कामावर ठेवणार नाहीत असे ठेकेदारास मान्य आहे.


8) एजंट/ठेकेदार मान्य करतात की, प्रत्येक वेळी बालकामगार अधिनियम, किमान वेतन कायदा व इतर साधर्म्य असणा-या अधिनियमांचे, फेर अधिनियमांचे, उपविधी, नियम व त्यांच्या बदलांचे नियमित पालन करतील. तसेच सदर अधिनियमांच्या तरतुदींचे उल्लघंन करून अशा कोणत्याही व्यक्तीस

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458240

Sub Treasury Office Vasai

16 DEC 2025

Addl. Treasury Officer

9) कामावर नेमून / वाहनतळाचे जागी काम करण्यास परवानगी देणार नाहीत व तसेच गुन्हेगारी यादीत नोंद असलेल्या कोणत्याही व्यक्तीस ठेकेदार वाहनतळावर कर्मचारी म्हणून नेमणुक करणार नाहीत.

10) या कराराचे मुदतीत सदर एजंट वाहनतळाच्या जागेची देखभाल व दुरुस्ती महापालिकेच्या समाधानार्थ करण्याची जबाबदारी एजंट/ठेकेदार स्विकारीत असून सदर देखभाल व दुरुस्ती करीताचे होणारे सर्व खर्च सदर एजंट/ठेकेदार हेच करतील.

11) महानगरपालिकेच्या भेट देणा-या अधिका-यांकडून माहिती घेणेसाठी "पैसे भरा आणि वाहन उभे करा" जागेत नोंदवही ठेवण्यास एजंट ठेकेदार यांच्यावर बंधनकारक आहे. वाहनतळावर येणाऱ्या वाहनांचा तपशिल ठेकेदार यांनी दिवसानुसार तसेच महिन्यानुसार अद्यावत करून ठेवणे ठेकेदार यांस बंधनकारक राहील. तसेच सदर जागेवर भेट देण्यासाठी येणा-या महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचा-याने मागणी केल्यास सदरचा तपशिल उपलब्ध करून देणे ठेकेदार यांच्यावर बंधनकारक राहिल.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

१२

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458237

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer
16/12/25


एफ) अपघात व हानी :

1) एजंट ठेकेदार मान्य करतो की, सदर वाहनतळाची देखभाल, डागडुजी करताना काही भागाची मोडतोड, नुकसान झाल्यास, किंवा कोणतीही व्यक्ती किंवा त्रयस्तापैकी कोणतीही माणसे जखमी झाल्यास त्याला महापालिका जबाबदार असणार नाही.
2) एजंट/ठेकेदार असे मान्य करतात की, महापालिकेकडून नोटिस मिळाल्यावर ते सदर नोटिस मिळाल्यापासून तीन दिवसांत सदर वाहनतळावर पे ॲन्ड पार्क च्या कामाबाबत झालेल्या दोषांची/कसुरांची दुरुस्ती महानगरपालिकेच्या समाधानार्थ स्वतःचे खर्चाने करतील आणि तसे न केल्यास महानगरपालिका ही कोणतीही पुढील नोटिस किंवा सुचना न देता सदर एजंट/ ठेकेदार यांचेच खर्चाने आणि जबाबदारीवर सदर आवश्यक असलेले काम करणेंस मुक्त राहील. सदर कामाकरीता झालेला खर्च इसारा रक्कम अथवा सुरक्षा अनामत रक्कमेमधून किंवा दोन्हीमधून वसूल करण्यात येईल.

For M/S. SHUBHAM CORPORATION
Proprietor

१३

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458242

Sub Treasury Office Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

3) मिरा भाईंदर महानगरपालिका, महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांना कोणत्याही हानी, नुकसान, तोटा यांपासून मुक्त ठेवून नुकसान, तोटा, मोडतोड, खर्च, शुल्क, मागणी, हक्क जे असेल त्याची भरपाई तसेच कामगार भरपाई नियम, 1924 नुसार भरपाईस पात्र असलेल्या नोकरांना, एखाद्या व्यक्तीला दुखापत अथवा महापालिकेच्या संपत्तीला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष झालेली नुकसान भरपाई, अपघात अथवा अन्य कोणत्याही कारणाने झालेली मोडतोड किंवा जिवीत हानी याची भरपाई स्व: खर्चाने देण्याचे एजंट/ठेकेदार मान्य करीत आहे.

जी) संबंधित प्राधिकरणांची परवानगी:

सदर एजंट/ठेकेदार हे सदर वाहनतळात पे ॲन्ड पार्क तत्वावर चालविण्यासाठी संबंधित सक्षम प्राधिकारणांची परवानगी/परवानग्या मिळवतील. सदर परवानग्या मिळवणे करीताचे होणारे खर्च आणि त्याचे शुल्क सदर एजंट/ठेकेदार हेच अदा करतील.


एच) कराराचे तसेच नियम आणि विनियमांचे अनुपालन करणे :

1) सदर एजंट/ठेकेदार यांनी या करारानुसार कोणतीही बाब करणेस नकार दिला किंवा हयगय केल्यास अशावेळी महानगरपालिका सदरचे काम करणेसाठी एजंट/ठेकेदारांना नोटिस देईल आणि तरीही सदर

For M/S. SHUBHAM CORPORATION
Proprietor

१४

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458239

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

एजंट/ठेकेदार यांनी सदरी कामे करणेची हयगय केली किंवा नकार दिल्यास अशावेळी सदर एजंट/ठेकेदार यांचेद्वारे पुढे करण्यांत आलेली हयगय किंवा नकारासंबंधात करावयाच्या कारवाई बाबतचे कोणत्याही अन्य अधिकारांना कोणतीही बाधा न येता, नकार दिलेले काम महानगरपालिकेमार्फत करून सदर एजंट ठेकेदार यांचेकडून त्या संबंधातील खर्च वसुल करणेस मनपास अधिकार राहील.

2) महापालिकेने निश्चित केलेल्या जागेवर (निविदा पुस्तकेतील **जोडपत्र अ)** पे अॅण्ड पार्क चालविण्यासाठी अडथळा निर्माण झाला किंवा मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भविष्यात विकास कामामध्ये सदर कामाचा/ जागेचा अडथळा निर्माण होत असल्यास, सदरच्या जागेतील पे अॅण्ड पार्क ची योजना रद्द किंवा स्थलांतर करणे हा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे. तो अंतिम राहिल व तो निर्णय एजंट/ठेकेदार यांस बंधनकारक असेल. याबद्दल ठेकेदार महापालिकेकडून नुकसान भरपाई मागणार नाही असे ठेकेदार मान्य करीत आहेत.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

१५

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458244

Sub Treasury Office Vasai

16 DEC 2025

Addl. Treasury Officer

3) एजंट/ठेकेदार मान्य/करतात की, भविष्यात महानगरपालिका, राज्य सरकार, केंद्र सरकारद्वारे कोणतेही नियम कायदयामध्ये पे अॅण्ड पार्कच्या दरांमध्ये करण्यात येणारे सुधार, बदल किंवा फेरफारांचे अनुपालन करण्याची जबाबदारी स्विकारीत आहेत.

4) एजंट/ठेकेदार मान्य करतात की, कंत्राटाच्या कालावधीत दर महिन्यांच्या महसूल रकमेवर चालू दराने वस्तु व सेवा कर मुदतीत भरण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहिल. सदर वस्तु व सेवाकराची रक्कम दर महिन्याला महानगरपालिका फंडात जमा करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे वेळोवेळी लागू झालेल्या वस्तु व सेवाकराच्या दराप्रमाणे सदर कराचा भरणा करणे ठेकेदार यांच्यावर बंधनकारक राहिल. वस्तु व सेवकराचा मूदतीत भरणा न केल्यास, विलंब केल्यामुळे लागणारा व्याज व दंड ठेकेदार यांच्याकडून वसुल करण्यात येईल आणि त्यासाठी ठेकेदार यांनी महापालिकेकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम (security deposit) किंवा तिचा भाग जप्त करण्याची कार्यवाही करणेत येईल.

5) मिरा भाईंदर महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे एजंट /ठेकेदारास बंधनकारक असेल व ठेकेदार ते मान्य करतात.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

१६

उपायुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

39



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458241

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

16/12/25

6) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या मधील कायद्यांचे पालन व मनपाचे धोरण पालन करण्याची जबाबदारी एजंट/ठेकेदार याची राहील.

आय) सर्व दावे, कारवाई नुकसानाबाबत एजंट/ठेकेदार यांची जबाबदारी :

१) या कराराद्वारे प्रदान करण्यांत आलेल्या वाहन पे ॲन्ड पार्कच्या अधिकारांची अंमलबजावणी करतांना निर्माण होणारे सर्व दावे, कारवाई, मागण्या, नुकसान, याबद्दल सर्वस्वी जबाबदारी एजंट/ ठेकेदाराची राहील.

२) पे ॲन्ड पार्कच्या कामासंदर्भात कोणत्याही व्यक्तींना किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेस किंवा अन्य व्यक्तींना कोणतीही हानी, नुकसान, दुखापत/इजा किंवा जिवित हानी झाल्यास त्याकरीता सदर एजंट/ठेकेदार हे एकटेच जबाबदार राहतील आणि अशा प्रकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष झालेल्या जिवित किंवा मालमत्तेच्या हानीपासून सदर एजंट/ ठेकेदार हे महानगरपालिकस पूर्णतः दोषमुक्त ठेवतील.तसेच कोणत्याही नुकसानीची भरपाई करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदार यांची राहिल.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

१७

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458246

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer
16/12/25

३) या कराराचे मुदतीत कोणत्याही वेळी संप, टाळेबंदी, संचारबंदी, साहित्याचा तुटवडा, युध्द, आग, पुर, महामारी, संसर्गिक रोग किंवा कोणतीही सरकारी अधिनियमिती किंवा विनिमय किंवा महानगरपालिकेच्या नियंत्रणाबाहेरील अशा कोणत्याही इतर कारणास्तव या करारात नमुद केलेल्या अटी आणि शर्तीनुसार कराराची पुर्तता करणे अशक्य झाल्यास सदर एजंट/ठेकेदार यांना कराराची पुर्तता करणेस अशक्य झाल्यास एजंट/ठेकेदार यांना महानगरपालिकेकडे कोणताही दावा करता येणार नाही. सदर कारणे ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी सुरू राहिल्यास, करार स्वयंचालितपणे समाप्त झाला असे समजले जाईल. त्याबाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागण्याचे अधिकार दोन्ही पक्षकारांकडे राहणार नाही. अशा परिस्थितीत निर्णय घेण्याचा अधिकार महानगरापालिका आयुक्तांकडे राहिल.

जे) अधिदानाच्या / महसूलाच्या (Payment) अटी व अनुसूची:

१) ठेकेदार हे मान्य करीत आहेत की, करारनामा झालेल्या तारखेपासून तीस दिवसानंतर येणा-या महिन्याच्या सात दिवसांच्या आत ठेकेदार यांनी प्रथम महसूल रक्कमेचा मासिक हप्ता रुपये

For M/S. SHUBHAM CORPORATION
Proprietor

१८

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458243

Sub Treasury Office Vasai

Sub Treasury Office Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

१,२३,७८९/- (अक्षरी रुपये एक लाख तेवीस हजार सातशे एकोणनव्वद मात्र) एवढी रक्कम मनपामध्ये भरणा करावी तदनंतर उदा. माहे मे या महिन्याचा होणारा मासिक महसूल माहे जून 1 ते 7 तारखेपर्यंत महापालिकेत भरणा करावा (सुट्टीचे दिवस वगळून) तसेच ठेकेदार हे मान्य करतात की, माहे मार्च महिन्यांची महसूल रक्कम त्याच महिन्यांच्या १५ तारखेपर्यंत महानगरपालिकेमध्ये भरतील, तसेच वस्तु व सेवा करासाठी 18टक्के नुसार (जीएसटी) मासिक रक्कम रुपये २२,२८२/- (अक्षरी रुपये बावीस हजार दोनशे ब्याऐंशी मात्र) प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेला भरणे बंधनकारक राहिल. ठेकेदार यांनी वरील नमूद मासिक हप्ताच्या रक्कम व वस्तु व सेवा कराची रक्कम डी.डी. स्वरुपात 'मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या' नावे महानगरपालिकेकडे कार्यादेश मिळाल्यापासुन सात दिवसांत भरणा करावेत. ठेकेदार यांनी महानगरपालिकेच्या नांवे डी.डी. महिन्याच्या ७ तारखेपर्यंत भरणे याबाबतचे हमी पत्र यासोबत देण्यात यावे.

२) करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार व महानगरपालिकेने /मा. प्रशासकीय सभेने दिलेल्या मंजुरी प्रमाणे पे अॅन्ड पार्क योजनेमधून प्राप्त होणारी मासिक महसूल रक्कमेप्रमाणे एजंट/ठेकेदार हे वार्षिक रक्कमेचा मनपामध्ये भरणा करतील.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

१९

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458248

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl Treasury Officer

16/12/25

३) सर्व अधिदाने/महसूल रक्कम (Payment) ही रोख किंवा मिरा भाईदर महानगरपालिकेच्या नावाने कोणत्याही शेडयुल/राष्ट्रीयकृत बँकेचे डी.डी. द्वारे भरण्यात यावे.

४) सदर कराराचे मुदतीत सदर एजंट/ठेकेदार हे महानगरपालिकेच्या कोणत्याही कामापासून किंवा कोणत्याही अदृश्य कारणांपासून किंवा अन्य आधारांवर काम करण्यास अडथळा निर्माण होण्याच्या कोणत्याही कारणांस्तव काम करण्यास असमर्थ असल्यास, त्याकरिता कोणताही दावा महानगरपालिकेकडे करणेस ठेकेदार यांना अधिकार राहणार नाहीत.


५) मुद्दा क्र.1 मध्ये नमुद केल्याप्रमाणे एजंट/ठेकेदार यांनी मुदतीत महसूल रक्कम देण्यास कसुर केल्यास, सदर महानगरपालिकेकडे अन्य कायदेशीर उपाययोजना खुल्या असल्यातरी सदर एजंट/ ठेकेदार हयांनी सदर मासिक हप्त्याची रक्कम देय झाल्याच्या दिनांकापासून ते सदर रक्कम महानगरपालिकेस ज्यादिवशी मिळाली त्या दिवसापर्यंत (दोन्ही दिवस मिळून) दरसाल 18 टक्के दराने व्याज दयावे लागेल आणि अशी रक्कम ठेकेदार यांनी सलग 2 महिने महानगरपालिकेस अदा न केल्यास महानगरपालिकेस सदरचा करारनामा रदद करण्याचे अधिकार राहिल आणि अशावेळी सदर एजंट/ठेकेदार यांनी जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) किंवा इसारा

For M/S. SHUBHAM CORPORATION
Proprietor

२०

उपायुक्त
मिरा भाईदर महानगरपालिका

३e



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458245

Sub Treasury Office Vasai

16 DEC 2025

Addl. Treasury Officer

16/12/25

६) रक्कम किंवा दोन्हीही जप्त करणेंचा अधिकार महापालिकेस राहील व काळ्या यादीत टाकून गुन्हा दाखल करण्यात येईल

७) जर सदर एजंट/ठेकेदार हे ठेक्याचे काम दिलेल्या मुदतीत सुरू करू शकले नाहीत तर महानगरपालिकेस सदर करार रद्द करण्याचा व ठेकेदार यांनी महापालिकेकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम किंवा इसारा रक्कम किंवा दोन्ही जप्त करण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील.

के) एजंट/ची दिवाळखोरी किंवा एजंट/द्वारे कराराच्या अटींचे पालन न करणे :-

१) जर सदर एजंट/ठेकेदार यांनी दिवाळखोरीची कोणतीही कृती केली किंवा दिवाळखोर घोषित झाल्यास किंवा त्यांचे विरुध्द विघटनाची कारवाई केली गेली किंवा स्वतः किंवा न्यायालयाचे निर्देशांना अधीन राहून केलेले विघटन किंवा एजंट ठेकेदार यांना या करारा अंतर्गतचे देय रकमेबाबत जप्ती कारवाहींचा सामना करावा लागल्यास किंवा महानगरपालिकेस देय असणाऱ्या रकमांचा भार सदर करारावर किंवा ठेक्यावर आल्यास किंवा त्यांचे क्रेडीटर्स बरोबर समेट केल्यास किंवा सदर एजंट/ठेकेदार यांनी या करारातील किंवा त्याच्या कोणत्याही भागातील अटी आणि नियमांचे पालन करणेत कसूर केली तर

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458250

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

अशावेळी महानगरपालिका ही सदर एजंट/ठेकेदार यांचेद्वारे झालेले उल्लघंन किंवा कसुर, याकरीता देय हप्ता किंवा मोबदला रूपाने किंवा नुकसान म्हणून सर्व रकमा वसूल करणेंच्या तिच्या अधिकारांना कोणतीही बाधा न करता सदर करारनामा रद्द करणेचा अधिकार महानगरपालिकेकडे राहील.

एल) प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट)

1) महापालिकासोबत झालेल्या सदर कराराच्या तारखेपासून 7 दिवसांत ठेकेदार / एजंट हे महापालिकेकडे प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) जमा करतील, त्याचप्रमाणे ठेकेदार यांनी निविदे सोबत महानगरपालिकेकडे जमा केलेली इसारा रक्कम प्रतिभूती ठेव रक्कम म्हणून समजण्यात येईल. (कराराची मुदत संपल्यानंतर पुढील 1 वर्षानंतर सदर इसारा रक्कमेचा परतावा मिळणेकरीता ठेकेदार यांना महानगरपालिकेकडे मागणी करावी लागेल.) सदर प्रतिभूती ठेव रक्कम ही एजंट/ ठेकेदार यांनी बिड बी फॉर्ममध्ये दर्शविलेला वार्षिक महसूल रक्कमेच्या 25 टक्के म्हणजेच रु. ३,७१,३६७/- (अक्षरी तीन लाख एक्काहत्तर हजार तीनशे सदुसष्ट रूपये) इतकी असेल. सदर सिक्युरिटी डिपॉझिटसाठी होणारी रक्कम बैंक गॅरंटी स्वरुपात भरणा करण्यांत यावा. सदर प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी

For M/S. SHUBHAM CORPORATION
Proprietor

२२

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458247

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

डिपॉझिट) कोणत्याही राष्ट्रीयकृत/शेडयुल्ड बँकेच्या बँक गॅरंटी स्वरुपात महापालिका यांचे नावांने देतील.

2) सुरक्षा अनामत रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) परत करणे :-
सुरक्षा अनामत (सिक्युरीटी डिपॉझिट) रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही. सदर कराराचा कालावधी संपल्यानंतर पुढील १ वर्षाकरीता सदर सुरक्षा अनामत रक्कम वैध राहिल.


3) सदर कराराचा कालावधी म्हणजेच ३ वर्षानंतर देखिल वाढविण्याचा निर्णय दोन्ही पक्षांनी घेतल्यास त्याच्या १५ दिवसात ठेकेदार यांना वाढीव मुदतीकरीता सुरक्षा अनामत रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) देणेस बंधनकारक राहील. वाढीव मुदतीकरिता नमूद मुदतीत सुरक्षा अनामत रक्कम न दिल्यास, वरील मुद्दा क्र.१ मधील नमूद सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

4) प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) जप्त करणे :-
संपूर्ण प्रतिभूती ठेव रक्कम (सिक्युरीटी डिपॉझिट) किंवा तिचा कोणताही भाग हा सदर एजंट/ठेकेदार यांनी सदर कराराच्या अटी आणि शर्तीचे पालन करणे कसूर केल्यास किंवा त्याच्या आवश्यकतांची पुर्तता/पालन न केल्यास सदर एजंट/ठेकेदार यांचे विरुध्द सदर महानगरपालिकेस असलेले दावे व

For M/S. SHUBHAM CORPORATION
Proprietor

२३

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका



महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458251

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

16/12/25

अधिकार यांना कोणतीही बाधा न आणता ती प्रतिभूती ठेव (सिक्युरीटी डिपॉझिट) किंचा तिचा भाग हा जप्त होणेस पात्र असेल.

एम) एजंटच्या सर्व जबाबदारीचे धोरण (सी. ए. आर.)-

सदर एजंट/ठेकेदार यांनी या करारात नमुद केलेल्या अटीशर्तीनुसार काम करण्यास नकार दिल्यास किंवा काम मुदतीपूर्व सोडल्यास किंवा महानगरपालिकेने सुचना दिल्यानुसार काम न केल्यास, सदरचे काम महानगरपालिका स्वतः किवा इतर ठेकेदारामार्फत सदरचे काम पूर्ण करील व सदरचे काम पूर्ण करणेकरीता झालेला पूर्ण खर्च किंवा फरकाची रक्कम या करारनाम्यातील एजंट/ठेकेदार यांच्याकडून वसूल करण्यात येईल.

एन) क्षतिपूर्ती (इन्डेमनीटी)-

1) सदर एजंट / ठेकेदार हे पे ॲन्ड पार्क करण्याच्या कामांपासून महापालिका यांचे कोणत्याही मालमत्तेस हानी किंवा नुकसान होणे किंवा वर्कमेन कॉम्पन्सेशन ॲक्ट अंतर्गत केलेले किंवा करण्यात येतील असे सर्व दावे, कारवाई मागणी यापासून किंवा कोणाही अन्य व्यक्तींचा मृत्यू अंपगत्व किंवा दुखापत यापासून निर्माण होणारे दावे यापासून महापालिकेला सर्वत्तोपरी दोषमुक्त ठेवण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहिल. आणि सदर संबंधातील सर्व खर्च, आकार किंवा दाव्याचे योग्य प्रकारे मुल्यमापन करुन सदर एजंट ठेकेदार हे महांपालिकेने मागणी केल्यावर तात्काळ भरपाई करून देतील.

For M/S. SHUBHAM CORPORATION
Proprietor

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँचसौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DV 458249

Sub Treasury Office Vasai

Sub Treasury Office
Vasai
16 DEC 2025
Addl. Treasury Officer

2) एजंट/ठेकेदार /यांचेद्वारे झालेल्या कायदयाच्या उल्लघंनापासून महापालिका यांना दोषमुक्त ठेवणे. एजंट/ठेकेदार यांचेकडून सदर कराराच्या किंवा ठेक्याच्या मुदतीत कायद्याच्या विरुध्द असतील अशा पे अॅन्ड पार्कच्या कामासंबंधात राज्य किंवा केंद्रसरकार किंवा स्थानिक प्राधिकरणे यांच्या कोणत्याही कायद्याचे किंवा नियम वगैरेचे उल्लघंन झाल्यामुळे आकारण्यात किंवा लादण्यात येणारे दंड, शिक्षा, आणि इतर खर्च वगैरे पासून महापालिका यांना सर्वतोपरी दोषमुक्त ठेवण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहिल.

3) सदर एजंट/ठेकेदार हे सर्व कॉन्ट्रॅक्ट लेबर (रेग्युलेशन अॅन्ड ऑपरेशन) कायदा व नियम तसेच मिनियम वेजेस अॅक्ट, बाल मजुर कायदा, इतर लेबर लॉ यासहित सर्व संविधी/पारिनियमांचे पालन करतील आणि सदर कायद्यापांसून निर्माण होणारे सर्व दावे, कारवाई यापासून महापालिका यांना सर्वतोपरी दोषमुक्त ठेवतील.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

ओ) एजेंट यांना महानगरपालिकेचे सहाय्य -

महानगरपालिका सदर ठेकेदार/एजंट यांचेचरोबर अशी प्रसंविदा करते की, सदर एजंट/ठेकेदार यांनी या करारातील सर्व अटी आणि शर्तीचे पालन केले आणि सर्व देव रकमा अदा केल्यावर त्यांना कोणत्याही अडथळा किंवा व्यत्ययाविना पे ॲन्ड पार्कचे काम करणेस अधिकार राहील, जेथे आवश्यकता असेल त्या ठिकाणी सदर महानगरपालिका एजंट ठेकेदार यांचे खर्चाने सदर एजंट ठेकेदार यांचे अधिकारांना अडथळा किंवा व्यत्यय निर्माण करणारे किंवा हस्तक्षेप करणारे व्यक्तीविरुध्द योग्य कारवाई करणेस सहकार्य करील.

पी) ठेका रद्द करण्याची नोटिस -

1) सदर करार/ठेक्याच्या मुदतीत सदर एजंट ठेकेदार यांचे व्यवस्थापन किवा प्रतिनिधी यांचे बाबत महानगरपालिका असमाधानी होईल असे कोणतेही कारण घडल्यास किंवा निविदा पत्रिकामध्ये नमूद खालील बाबींचे तक्रार प्राप्त झाल्यास एजंट/ठेकेदार यांना महानगरपालिकेकडून दंड आकारण्यात येईल.

अनुसूची -1

1. साईट अटेंडन्ट / सुरक्षा रक्षक हे गणवेश/ ओळख पत्राशिवाय असल्यास रु.1000/-
2. पार्कींग बेज न रंगविल्यास रु.2000/-
3. ठेकेदाराचे नांव, दर सुची, दर्शविणारास बोर्ड न लावल्सास रु.2000/-
4. वाहने शिस्तीने पार्क न केल्यास रु.1000/-(प्रती दिन)
5. साईट चौकीवर माहिती पुस्तिका न ठेवल्यास रु.1000/-
6. निश्चित दरापेक्षा जास्त दर आकारीत असल्याचे आढळल्यास रु.2000/-प्रती वाहन
7. पार्कींगची जागा स्वच्छ न ठेवल्यास रु.1000/-

सदर दंडाची रक्कम एकुण निविदा रकमेच्या 5 टक्केच्या वर गेल्यास, अशावेळी महानगरपालिका एजंट/ठेकेदार यांना लेखी नोटिस देवून सदर नोटिसमध्ये नमुद केलेल्या असमाधानाबाबतच्या त्रुटीचे खुलासा करणेस सांगेल. सदर एजंट/ठेकेदार हे नोटिस प्राप्त झाल्यापासून 15 दिवसांच्या मुदतीत अशा असमाधानाबाबतच्या कारणांची दुरुस्ती महानगरपालिकेच्या समाधानार्थ दूर करू शकले नाहीत. तर अशावेळी याउलट सदर करारात काहीही नमुद केले असले तरी महानगरपालिकेस एजंट/ठेकेदार यांना 15 दिवसांची पूर्व नोटिस देऊन सदर करारनामा रद्द करण्याचा महापालिकेला अधिकार राहतील. करारनामा रद्द केल्यानंतर लगेचच महानगरपालिकेमार्फत सदर पे ॲण्ड पार्कच्या जागेचा ताबा घेण्यात येईल.

2) पहिला महसुलाचा हप्ता देण्यास कसूर केल्यास किंवा सदर एजंट ठेकेदार यांनी माघार घेतली किंवा ठेका सुरु केला नाही. अशावेळी एजंट ठेकेदार यांना 7 दिवसांची पूर्व लेखी सुचना देवून ठेका रद्द करणेचा अधिकार महानगरपालिकेस असेल आणि सदर सुचनेचा काळ संपल्यावर सदर करारनामा रदद होईल आणि सदर एजंट ठेकेदार यांची ई.एम.डी. किवा प्रतिभूती ठेव रक्कम किंवा दोन्हीही जप्त केल्या जातील.

3) सदर एजंट ठेकेदार यांनी करारातील कोणत्याही अटीचे उल्लघंन केले किंवा महापालिका यांना देय असलेली रक्कम देणेस कसूरवार ठरल्याने, कायद्याने तो त्याची कर्ज चुकती करू शकत नाही असे मानले गेल्यास म्हणजेच दिवाळखोर घोषित केल्यास किंवा सदर कंपनीचे व्यवहारांचे समायोजनाबाबत ठराव मंजुर किंवा पास करण्यात आल्यास अशावेळी महापालिका ही सदर एजंट ठेकेदार यांना नोटिस

२६

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

उपायुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

देवून सदर एजंट ठेकेदार यांना या कराराअंतर्गतच्या कोणत्याही जबाबदारी किंवा दायित्वापासून मुक्त न करता किंवा महापालिका यांना दिलेले अधिकार आणि प्राधिकारांना कोणतीही बाधा न करता सदर करार रद्द करतील आणि सदर ठेक्याचे काम पूर्ण करणे करीता अन्य एजंट /ठेकेदार यांना नियुक्त करतील.

4) एजंट/ठेकेदाराने पे ॲन्ड पार्कची सुविधी पुरविण्याबाबतचे काम या कराराच्या कालावधी पुरतेच करावे.

5) सदर करारनामा रद्द झालेवर महापालिका ही तिचे प्रमाणकानुसार सदर एजंट/ठेकेदार यांचेकडून येणे असलेली रक्कम व/किंवा भरपाई म्हणून वसूल करावयाच्या रकमेचे मुल्यांकन करील, अशी रक्कम महापालिका ठेकेदार यांचे प्रतिभूती ठेव रकमेतून किंवा या कराराअंतर्गत ठेकेदार यांनी भरणा केलेल्या अन्य कोणत्याही रक्कमेतून किंवा महापालिका यांचे बरोबर केलेला इतर करार किंवा ठेका व सामानाच्या जप्ती याद्वारे किंवा इतर मार्गाने वसूल करील.

क्यु) ठेका पूर्णत: किंवा अंशत: मुदतीपुर्व रद्द करणे :-

1) कोणत्याही वेळी महानगरपालिकेने जर सर्व किंवा कोणत्याही पे ॲन्ड पार्कची जागा (निविदेत विनिर्दिष्ट केल्यानूसार) कोणत्याही कारणांस्तव मागे घेणेचे ठरविल्यास आणि अशा कोणत्याही किंवा सर्व जागा मनपास आवश्यक असल्यास अशावेळी महानगरपालिका 15 दिवसांची पूर्व सूचना देवून सदर करार मुदतीपूर्वी रद्द करील अशाप्रकारे मुदतपुर्व करार रद्द करतेवेळी सदर एजंट/ठेकेदार यांना सदर करार अकस्मात रद्द केल्याच्या कारणांस्तव महानगरपालिकेच्या विरुध्द कोणत्याही भरपाईचा दावा करणेस अधिकार राहणार नाहीत व करार खंडीत करणेच्या तारखेपर्यंत वापरण्यात आलेल्या पे ॲन्ड पार्कचा हप्ता महानगरपालिकेस अदा करील. सदर ठेक्याचा कालावधी संपुष्टात आल्यास किंवा सदरचा करारनामा रद्द झाल्यास (मुदतपूर्वी) ठेकेदार महापालिकेस पे अँड पार्कच्या जागेचा ताबा (Peaceful and vacant session) परत करील. सदर ठेका समाप्तीनंतर ठेकेदार यांनी सदर जागेचा ताबा देण्यास कसूर केल्यास, सदर जागेतून महापालिका ठेकेदारास अतिक्रमण (Encroach) समजून काढून टाकील आणि सदर कारवाई करीत असताना ठेकेदाराच्या कोणत्याही मालमत्तेस हानी झाल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही.

2) एजेंट/ठेकेदार असे मान्य करतो की, जर सदर जागा महापालिकेला वापरात द्यावी लागली किंवा महापालिकेच्या काही कारणास्तव बंद करावी लागली तर महापालिकेस मुदती आधी करार संपविण्याची मुभा राहील. त्यावेळी एजंट / ठेकेदार सर्व जागा खाली करून देईल. व त्यासाठी कोणतीही मोडतोड भरपाई किंवा नुकसान शुल्क मागणी आणि पर्यायी जागेची मागणी करू शकणार नाही. तथापि वाहनतळ ज्यावेळेस बंद होईल तोपर्यतचे होणारे महसूल भरावे लागेल.

3) कराराची मुदत संपताच किंवा मुदतपूर्व करार संपविल्यास वाहनतळाची जागा एजंट/ ठेकेदार शांतपणे रिकामी करून त्वरीत मनपास जागेचा ताबा हस्तांतरीत करण्याचे मान्य करीत आहेत.

आर) वादाचा निवाडा :-

एम.बी.एम.सी आणि एजंट ठेकेदार यांचेमध्ये या करारा संबंधातील कोणत्याही प्रकरणावरून कोणताही वाद निर्माण झाला किंवा सदर कराराच्या मुदतीमध्ये किंवा करार पुर्ण झाल्यावर कोणताही वाद निर्माण झाल्यास तो वाद मिटवणेकरीता मा.न्यायालय, ठाणे येथे कार्यक्षेत्र राहिल.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

२८

उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

एस) सामान्य अट (General Condition) :-

1) ठेकेदार मान्य करतो की, मनपाने वाहनतळाच्या जागेत एखाद्या व्यक्तीला किंवा कंपनीला मोबाईल ॲडव्हटायजिंग व्हॅन ही उभी करून जाहिरात करण्याकरीता परवानगी दिल्यास ठेकेदार सदर वाहनांवरील फक्त मनपाने मंजुर केलेल्या पे ॲण्ड पार्कसाठी ठरविण्यात आलेल्या दरपत्रकानुसार शुल्क आकारेल. तसेच ठेकेदार यांना सदर वाहन मालकांकडून जाहिरातीचा कोणताही मोबदला वसूल करण्याचा अधिकार राहणार नाही.
2) ठेकेदार मान्य करतो की, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम अन्वये सदर करारनाम्यावर होणारी स्टॅम्प डयुटी भरण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील. तसेच शासन निर्णयानुसार स्टॅम्प डयुटीच्या रक्कमेत बदल झाल्यास उर्वरित रक्कम भरण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.
3) निविदा दस्तावेज व कार्यादेश हे करारनाम्याचे भाग राहतील.

महापालिकायांचेकडे निविदा फॉर्म सोबत सादर केलेले सर्व दस्ताऐवज व निविदा या कराराचा/ठेक्याचा एक भाग मानला जाईल. त्याचे तंतोतंत पालन करणे एजंट/ठेकेदार ची जबाबदारी राहील, सदर करारनामा व निविदा यांच्या वाक्यरचनेमध्ये काही विसंगती आढळून आल्यास सदर करारनाम्यातील अटीशर्ती एजंट/ठेकेदार यांना लागू राहतील.

यातील साक्षीत नमुद केलेले पक्षकार व साक्षीदार यांनी या करारात माहे ~~मार्च~~ २०२६ या वर्षी समक्ष स्वाक्षरी केली आहे. यांतील नमुद केलेले पहिले पक्षकार

मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे करीता अति-आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी समक्ष सही केली आहे.

उप-आयुक्त (पे ॲण्ड पार्क)

साक्षीदार

1) श्री.दिपक खांबित,
शहर अभियंता, मिरा भाईंदर महानगरपालिका

2. श्री.संभाजी पानपट्टे
अति-आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका

यांतील नमुद केलेले दुसरे पक्षकार

---------- यांनी समक्ष स्वाक्षरी केली आहे.

For SHUBHAM CORPORATION

Proprietor

(एजंट / ठेकेदार)

साक्षीदार :-

1. Anil Yadav . अनिल यादव
2. Sandeep jiwa

Today

श्री दरोगा पांडे
(सदस्य - स्थायी समिती)

(विशाल ज. पाटील)

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

Additional Commissioner
Mira Bhaindar Municipal Corporation

सन 2026 /2026 करारनामा नोंदवही
अनु. क्र.७२४ दि. ०८/ १० /२६ अन्वये
नोंद करणेत आली. (एकूण पाने १ ते ५५)

महापालिका सचिव
मिरा-भाईंदर महानगरपालि.

मिरा भाईंदर महानगरपालिका

विभागाचे नाव :- पे अॅण्ड पार्क विभाग

कामाचे नाव :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दित भाईंदर पश्चिम रेल्वेस्टेशन जवळ स्काय वॉक खाली येथील पे अॅण्ड पार्क वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणेबाबत.

निविदा मंजुरी पत्र क्रं :- जा.क्र.मभा/१२५/पे अॅण्ड पार्क/२०२५-२६, दि. १८/३/२०२६

निविदा रक्कम :- ४८,५६,४०४/-

भरावयाचे मुद्रांक शुल्क :- रु.१२५००/-

प्रत्यक्ष भरणा केलेले मुद्रांक शुल्क :- रु. १२५००/-

प्रमाणित करण्यात येते की, वर नमुद माहिती योग्य असुन, सदर कामी शासन दप्तरी भरणा करावयाची मुद्रांक शुल्काची संपुर्ण रक्कम भरणा केलेली आहे. सदर कामी भरण केलेल्या रकमेचे चलन दुबार वापरण्यात येणार नाही. व सदर रक्कमेचा परतावा घेण्याचा आम्हास कोणताही अधिकार नाही आणि जर आम्ही सदरकामी भरणा केलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम परतावा म्हणुन परस्पर काढून घेतल्यास, आम्ही मुद्रांक महसुल अधिनियमानुसार कायदेशीर / फौजदारी कारवाईस पात्र असणार आहे.

For M/S. SHUBHAM CORPORATION

Proprietor

मिरा भाईंदर महानगरपालिका
MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.
दूरध्वनी: 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985
ईमेल: mbmcho@gmail.com वेबसाईट: www. mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मुख्य कार्यालय

जा. क्र. मिभा / मनपा / १२८ / पे अॅण्ड पार्क / २०२५-२६ दिनांक: 30/3/2026

// कार्यादेश //

प्रति,
मे.एस.एस.ई एन्फ्रास्ट्रक्चर अॅण्ड डेव्हलपर्स प्रा.लि.
बी १०१, ज्युपिटर अर्पा., पुनम सागर कॉम्पलेक्स,
मिरा रोड (पू.)ता.जि.ठाणे ४०११०७

विषय :- मौजे नवघर स.क्र.३८७/२,७ (जुना) १५८/२,७ नविन या जागेखाली आरक्षण क्र.२६४ अे या जागेत पे अॅण्ड पार्क (वाहनतळ) ठेका पध्दतीने चालविणेबाबत. (Tender ID २०२५_MBMC_११८४६९८_१)

संदर्भ :- १.मा. प्रशासकीय सभा दि.०४ / ११/२०२५ ठराव क्र.२८७
२.दि.३०/०३/२०२६ रोजीचा करारनामा

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे नवघर स.क्र.३८७/२,७ (जुना) १५८/२,७ नविन या जागेखाली आरक्षण क्र.२६४ अे जागेत पे अॅण्ड पार्क ठेका पध्दतीने चालविणे संदर्भात आपली दि.२८/०५/२०२५ रोजीची (Tender ID २०२५_MBMC_११८४६९८_१)निविदा मा.प्रशासकीय सभा दि.०४ / ११/२०२५ ठराव क्र.२८७ नुसार स्विकृत करण्यात आलेली आहे. करारनाम्यातील अटीशर्तीच्या अधिन राहून आपणांस दि.०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२९ रोजी पर्यंत (म्हणजे दि.३१/०३/२०२६ रोजी रात्री १२.०० नंतर) पे अॅण्ड पार्क ठेका पध्दतीने चालविणेकरिता परवानगी देण्यात येत आहे.

मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय

(प्रणाली घोंगे)
उप-आयुक्त(पे अॅण्ड पार्क)
मिरा भाईंदर महानगरपालिका

d:\pay & park dept\tender\264 ए नवघर टेंडर\work order sse-2026.docx